लोकमत

# विद्यापीठात आज 'स्वरार्पण'

कोल्हापूर : शाहू छत्रपती यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठात आज, शनिवारी सकाळी ११ वाजता 'स्वरार्पण' सांगीतिक कार्यक्रम होणार आहे. विद्यापीठातील शाहू सभागृहातील या कार्यक्रमात संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे विद्यार्थी सहभागी होणार आहेत. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत 'स्वरार्पण' होणार असल्याची माहिती संगीत व नाट्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांनी दिली.

महासत्ता

# विधी अभ्यासक्रमाच्या परीक्षा १८ जानेवारीपासून

कोल्हापूर ता.५ (प्रतिनिधी)-

शिवाजी विद्यापीठ संलग्नीत विधी महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील ऑक्टो./ नोव्हें. २०२२ हिवाळी सत्रातील विधी अभ्यासक्रमाच्या परीक्षा ता.१८ जानेवारी, २०२३ पासून सुरु होणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी कळविले आहे. यापूर्वी या परिक्षा ता.६ जानेवारी पासून सुरू होणार होत्या मात्र शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून ३ व ५ वर्षीय विधी अभ्यासक्रमाच्या प्रश्न पत्रिकेच्या स्वरूपातील बदलामुळे ता.१८ पासून प्रारंभ होणार आहे.

0 7 JAN 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ विधी शाखेच्या परीक्षा १८ पासून

## बाळासाहेबांची शिवसेना-युवासेनेच्या आंदोलनाचे यश

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ प्रशासनाने विधी शाखेच्या परीक्षा पुढे ढकलून दि. १८ जानेवारीपासून त्या सुरू करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती पत्रकाद्वारे दिली आहे.

विधी शाखेच्या ३ आणि ५ वर्षांच्या परीक्षांसंदर्भात राज्य-नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली बाळासाहेबांची शिवसेना-युवासेनेच्या शिष्टमंडळाने दि. २८ रोजी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्रशासनाची भेट घेतली. कोरोनाची संभाव्य लाट, तसेच सेमिस्टर नोव्हेंबरमध्ये सुरू झाले असताना जानेवारीत होणाऱ्या परीक्षा एमसीक्यू पद्धतीने घ्याव्यात, तसेच कम्बाईन पासिंग लागू करण्याबाबत २४ तासांत निर्णय घ्यावा, अशी विनंती निवेदनाद्वारे केली होती.

या मागणीवर कार्यवाही न झाल्याने पुन्हा दि. ३१ डिसेंबर रोजी कार्यकर्त्यांनी निदर्शने केली. त्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. जिल्हाप्रमुख चेतन शिंदे, जिल्हा संपर्कप्रमुख प्रसाद चव्हाण, जिल्हा समन्वयक अविनाश कामते, शहर समन्वयक शैलेश साळोखे, शहरप्रमुख विश्वदीप साळोखे, पीयूष चव्हाण, मंदार पाटील, सरचिटणीस कुणाल शिंदे, दादू शिंदे, विश्वजित चव्हाण, शिवतेज सावंत, अभिषेक मंडलिक आदी सहभागी झाले होते.

पुण्यनगरी

# कुस्ती स्पर्धेमध्ये वैष्णवी कदम प्रथम

**अणदूर :** तिसंगी (ता. गगनबावडा) येथील म. ह. शिंदे महाविद्यालयातील विद्यार्थिनी वैष्णवी शिवाजी कदम (बी.ए. भाग ३) हिने शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय महिला कुस्ती स्पर्धेमध्ये ७२ किलो वजन गटामध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केला. तिची निवड पुणे येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ महिला कुस्ती स्पर्धेसाठी झाली आहे. तिला ज्ञानसाधना शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष पी. जी. शिंदे, सचिव स्वप्नील शिंदे, प्र. प्राचार्य डॉ. बी. एस. पडवळ यांचे प्रोत्साहन मिळाले, तर जिमखानाप्रमुख प्रा. बाजीराव पाटील यांचे मार्गदर्शन मिळाले.

07 JAN 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## लाखोंची कमाई; यळगूडच्या शिवराज बागलने १८ व्या वर्षी घेतला निर्णय

# रेशीम शेतीत मिळविला हातखंडा

▸ **सदानंद पाटील : सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ६ : आसपास उसाची शेती. स्वतःचाही दहा एकर ऊस. मात्र, उत्पादन खर्च व उत्पन्नाचा मेळ बसेना. तसेच, वर्ष - सव्वा वर्ष शेतात उस ठेवून, तो गेल्यावर टप्प्याटप्प्याने मिळणारे पैसे फार काही उपयोगाला येत नसल्याचे ध्यानात आले. त्यामुळेच वयाच्या अवघ्या १८ व्या वर्षी शिवराज राजेंद्रकुमार बागल (यळगूड, ता. हातकणंगले) याने रेशीम शेती करण्याचा निर्णय घेतला. शिक्षण घेत-घेत शिवराजने रेशीम शेतीत हातखंडा मिळविला. दरवर्षी यातून तो लाखो रुपयांची कमाई करतो.

आज एम.एससी.च्या अंतिम वर्षात शिकत असताना पुढे याच विषयात पीएच.डी. करण्याचा निर्णय घेतला आहे.

शिवराजला दहावीत असतानाच शेतीची गोडी लागली. त्याची भेट रेशीम शेतीतील जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ डॉ. ए. डी. जाधव यांच्याशी झाली. त्यावेळी डॉ. जाधव हे एम.एससी. च्या मुलांना शेतीच्या सहलीसाठी नेत. शाळेत असताना विज्ञानातील प्रयोग करण्यासाठी शिवराज सतत डॉ. जाधव यांच्या संपर्कात होता. कॉलेजला प्रवेश मिळाल्यानंतर मात्र त्याने शेतीत लक्ष घालण्याचा निर्णय घेतला. पाणी मुबलक असल्याने शिवराजने रेशीम शेती करावी, असा सल्ला डॉ. जाधव यांनी दिला.



**शेतातील वेगळी 'वाट'**
**भाग ४**

उसाची शेती कायम ठेवून शिवराजने चार एकर शेतीत तुतीची लागवड केली. तुतीची पाने हे रेशीम किड्यांचे अन्न आहे. त्यामुळे ते अन्न जेवढे सकस तेवढी किड्यांची वाढ चांगली होत असल्याचे त्याला सांगण्यात आले. त्यामुळे तुतीवरती सेंद्रिय औषधांची फवारणी करून चांगल्या पानांची निर्मिती केली. रेशीम उत्पादनासाठी शेडची उभारणी केली. यासाठी शासनाकडून अनुदानही मिळाले. शेडमधील आर्द्रता, तापमान नियंत्रित ठेवले. रेशीम कोश तयार करण्यासाठी दर्जेदार अंडीपुंजांची खरेदी केली. तसेच पुढील सर्व प्रक्रिया करून उत्पादनाला सुरुवात केली. चांगले नियोजन केल्याने रेशीमचे चांगले उत्पादन झाले. तसेच बेंगलोर येथे चांगला भाव मिळाल्याने पहिल्याच टप्प्यात या शेतीने लाखोंची कमाई करून दिली.



**रेशीम कोश दाखविताना शिवराज बागल.**

> शासनाने रेशीम कोश खरेदीसाठीचे दर निश्चित करावेत. दरात मोठा फरक राहत असल्याचे दिसत आहे. आजघडीला कोशांना चांगला दर मिळत असला तरी ते दर कधी निम्म्याने खाली येतील, हे सांगता येत नाही. त्यामुळे वर्षभर सरासरी दर निश्चित होणे आवश्यक आहे. या शेतीत येणाऱ्यांना मोठी संधी आहे. फक्त चिकाटीने व जागरूकपणे रेशीम शेती करावी लागते
>
> **- शिवराज बागल**, यळगूड

तुतीची चांगली लागवड असल्याने वर्षाला सरासरी पाच ते १० बॅचच्या माध्यमातून रेशीम उत्पादन घेतले जाते. एका बॅचला किमान एक लाख रुपयांचा लाभ होतो. त्यामुळे ही शेती फायदेशीर ठरत आहे. शासनाने या शेतीकडे लक्ष दिले तर कित्येक तरुण या शेतीत येतील, अशी अपेक्षा आहे.

(समाप्त)

Times of India

# SUK postpones law exams to January 18

Kolhapur: The Shivaji University Kolhapur (SUK) has postponed the winter session exams for three year and five year law courses to January 18.

The SUK has seven law colleges. Ajitsinha Jadhav, the exam controller of SUK said, "The exams were supposed to begin from Friday. However, few had moved a petition in the court demanding the exam to be held on multiple choice questions basis. However, the petition has been withdrawn and the question papers will be set on descriptive basis. We will soon announce the schedule of various subjects of the law courses on SUK's website." TNN